अग्रलेखांचा बादशहा नवा काळ

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा बादशहा नवा काळ

# त्यांना आमची बुद्धिमत्ता आणि बाजारपेठही हवी

जगातल्या एका मोठ्या कंपनीसाठी भारतातल्या एका तरुणाची मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती झाल्याबरोबर देशभरामध्ये काय आनंद व्यक्त झाला हे वेगळे सांगण्याची गरज नाही. बिल गेट्स यांच्या मायक्रोसॉफ्ट कंपनीच्या व्यवस्थापनाने हैद्राबाद इथल्या सत्या नाडेला या सेहचाळीस वर्षीय तरुणाची निवड केली. मणिपाल इथल्या इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीमधून बीई झालेल्या नाडेलाने कॉम्प्यूटर सायन्समधल्या एमएस आणि एमबीएचा अभ्यासक्रम अमेरिकेत पूर्ण केला. १९९२ साली मायक्रोसॉफ्ट कंपनीत दाखल झालेल्या नाडेलाने स्वत:ची गुणवत्ता सिध्द केली. म्हणूनच या कंपनीचे तिसरे सीईओ होण्याचा मान नाडेलाला मिळू शकला. त्यांच्या नियुक्तीमुळे अनेक भारतीयांना आनंद होणे स्वाभाविक आहे. प्रामुख्याने तंत्रज्ञान क्षेत्रामध्ये भारताने घेतलेली आघाडी आणि त्याला अमेरिकेसारख्या देशामध्ये मिळत असलेली ही दाद पाहिल्यानंतर भारतीय तरुणांमधल्या बुद्धिमत्तेचा तो जागतिक गौरव ठरतो. आपल्याकडे एकूणच विज्ञान, तंत्रज्ञानाचा प्रसार बऱ्यापैकी उशिरा झाला. परंतु गेल्या तीस–पस्तीस वर्षात भारताने या क्षेत्रामध्ये जी भरारी घेतली आहे ती निश्चितच वाखाणण्यासारखी ठरते. विशेषत:, भारतातील आयआयटीसारख्या संस्थांनी विज्ञान तंत्रज्ञानामध्ये खऱ्या अर्थाने बुद्धिमत्तेला श्रेष्ठ ठरवण्याचे परिश्रमपूर्वक प्रयत्न केल्याचे दिसून येते. मायक्रोसॉफ्ट हा एक मोठा जागतिक ब्रँड आहे. कॉम्प्यूटरमधल्या जवळपास सगळ्या उत्पादनांची निर्मिती मायक्रोसॉफ्ट करते. अशा जागतिक स्तरावरच्या आणि त्याच जागतिक स्पर्धेत तितक्याच तुल्यबळ असलेल्या या कंपनीत एखाद्या भारतीय तरुणाकडे मोठे पद चालून यावे, ही गोष्ट भारतीयांसाठी अभिमानाची आहेच आणि त्याचबरोबर थोडी आत्मपरीक्षणाचीही आहे. नाडेला यांच्याकडे असलेली गुणवत्ता, बुद्धिमत्ता, कल्पकता या सर्वांचा एकीकडे सन्मान होत असताना भारतीय तरुण जगाच्या नकाशावर आपले स्वत:चे स्थान निर्माण करत आहेत. त्याच तरुणांच्या बुद्धिमत्तेचा भारत कसा उपयोग करून घेणार आहे याचा यानिमित्ताने विचार झाला पाहिजे. यापूर्वीसुध्दा जगातल्या अग्रगण्य अशा सीटी ग्रूपच्या प्रमुखपदी महाराष्ट्रातल्याच पंडित यांची निवड झाली. तर पेप्सी कंपनीच्या प्रमुखपदीसुध्दा इंद्रानोई यांची निवड झाली होती. आतापर्यंत किमान पंचवीस ते तीस भारतीयांनी जागतिक स्तरावरच्या कंपन्यांमधून आपले श्रेष्ठत्व सिध्द केलेले आहे.

## अमेरिकेत भारतीय तरुणांची महासत्ता

आजच्या संगणक युगामध्ये अमेरिकेच्या सिलीकॉन व्हॅलीमध्ये भारतीयांनी आपला दबदबा निर्माण केला. तिथल्या एकूण इंजिनिअर्सपैकी तीस टक्के इंजिनिअर्स हे भारतीय आहेत. यावरून भारताची केवढी मोठी बौध्दिक संपदा आज अमेरिकेचा गौरव वाढत आहेत. प्रामुख्याने आयआयटीमधून पदवी संपादन केलेल्यांची संख्या त्यात जास्त दिसून येते. १९६६ पासून भारतातला बराच आयआयटी झालेला वर्ग अमेरिकेत स्थायिक होऊ लागला. १९९० मध्ये तर तो तिथे चांगलाच स्थिरावला.आणि या सिलीकॉन व्हॅलीमध्ये बुद्धिमत्तेची चमक असलेल्या भारतीयांनी स्वत:बरोबर आपल्या देशाचे नाव अजरामर केले. म्हणूनच जागतिक स्तरावरच्या एका मोठ्या कंपनीमध्ये उच्च दर्जाची आणि उच्च पदावरची नोकरी मिळाल्याचे समाधान या सगळ्या इंजिनिअर्सला नेहमीच वाटत आले आहे. परंतु, याचा दुसरा फार महत्त्वाचा भाग म्हणजे हुशार आणि तल्लख तरुणांना अमेरिकेमध्ये मिळालेली संधी हा भारतातल्या दर्जेदार शिक्षणाचादेखील फार मोठा गौरव ठरतो. मुळातच भारतीय तरुणांच्या बुद्धिमत्तेबद्दल शंका घेण्याचे काहीच कारण नाही त्यातही आपण ज्याठिकाणी काम करतो त्याठिकाणी सगळ्या निष्ठा समर्पित करायच्या आणि ती कंपनी किंवा तो देश आपलाच आहे अशा समर्पित भावनेने तिथे नोकरी करण्याची भारतीय तरुणांची वृत्ती अमेरिकेसारख्या महासत्तेला अत्यंत पोषक ठरली. १९८०च्या दशकात अमेरिकेतल्याच नासाच्या म्हणजेच अंतराळ संशोधन संस्थेमध्ये भारतीय तरुणांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग झाला. त्यावेळी भारतातल्या अंतराळ संशोधनाकरता आपल्यालाच अमेरिकेकडून उसनवारीवर तंत्रज्ञान घ्यावे लागले. आपल्याच तरुणांनी अमेरिकेत तंत्रज्ञान विकसित करायचे आणि अमेरिकन कंपनीकडून आपण ते भरमसाठ पैसे देऊन विकत घ्यायचे असा हा 'अव्यापारेषु व्यापार' होत राहिला. त्यावेळी भारतीय शास्त्रज्ञ, बुद्धिवंत, विचारवंतांमध्ये आणि राज्यकर्त्यांमध्येसुध्दा अमेरिकेत होत असलेल्या भारतीय ब्रेनडनविषयी मोठ्या प्रमाणावर चिंता व्यक्त झाली होती. भारताची बुद्धिमत्ता अमेरिकेकडे वाहात चालली आहे तिचा उपयोग भारतालाच झाला पाहिजे अशी एक जागृतीही त्या काळात निर्माण झाली. आजही सत्या नाडेला यांच्या कर्तृत्वाचा वापर मायक्रोसॉफ्ट कंपनी करते आणि या कंपनीचे सगळे प्रॉडक्टस भारतात प्रचंड प्रमाणात खपतात.

## भारतासाठी मोठा धडा

सत्या नाडेला यांच्या मायक्रोसॉफ्टमधल्या नियुक्तीबद्दल अभिमान व्यक्त करत असतानाच भारत सरकारने या गोष्टीकडे अधिक डोळसपणे पाहण्याची गरज असल्याचे आम्हाला वाटते. एवढेच नव्हे तर भारतीय कंपन्यांनी भारतीय तरुणांच्या बुद्धिमत्तेचा आपल्याच देशामध्ये अधिक उपयोग करुन घेतला पाहिजे. किंबहुना, त्यांच्या या गुणवत्तेचा गौरव होईल अशा प्रकारची संधी त्यांना दिली पाहिजे. शेवटी मायक्रोसॉफ्ट ही बोलून चालून व्यावसायिक कंपनी आहे. सत्या नाडेला यांच्या नियुक्तीत त्यांच्या गुणवत्तेचा गौरव तर आहेच, पण त्याचबरोबर मायक्रोसॉफ्ट कंपनीला त्यांची नियुक्ती करताना भारतासारखी मोठी बाजारपेठही हवी होती. याकडेही दुर्लक्ष करता येणार नाही. म्हणजेच मायक्रोसॉफ्टला आमची बुद्धिमत्ताही हवी आहे आणि आमची बाजारपेठही हवी आहे. एकूणच जगातल्या सगळ्या प्रगत राष्ट्रांचे भारताकडे एक बाजारपेठ म्हणून जास्त लक्ष आहे. जर सत्या नाडेलांसारख्या कर्तृत्ववान तरुणांनी थोडी जोखीम पत्करून भारतासाठी मेहनत घेतली तर याच देशामध्ये बिल गेट्स आणि स्टिव्ह जॉब्स् निर्माण होऊ शकतो. जगाला तंत्रज्ञान पुरवण्याची क्षमता भारत प्राप्त करू शकतो. त्यासाठी सरकारने देखील भारतातल्या या बुद्धिमत्तेचे बळ समजून घेतले पाहिजे आणि तशा संधी दिल्या पाहिजेत. नाडेला यांच्या नियुक्तीतून भारताला हा धडा घेता येऊ शकतो.